**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेसंबंधी**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोर्ड दाखवून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे मी विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी देतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये मी सूचना दिलेली आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विषय मांडू द्यावा त्याबाबत मला काही बोलावयाचे नाही. सभागृहाच्या प्रथा परंपरेप्रमाणे सभागृहात कोणताही बॅनर किंवा बोर्ड आणता येत नाही. असा नियम अनेक वर्षापासून आहे. सभापती महोदय, आपल्यामार्फत मी अशी विनंती करतो की, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सभागृहात कोणताही बोर्ड किंवा बॅनर ठेऊ नये. ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

**सभापती** : मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, आपल्या भावना मला कळल्या आहेत, आपण बोलण्यास संधी मागितल्यामुळे मी आपणास संधी दिली होती. विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी दिल्यामुळे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बॅनर व बोर्ड खाली करावेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये राज्यातील दुष्काळ, तीव्र पाणी टंचाई, चारा टंचाई व शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव न मिळणे, त्यामुळे मागील एका वर्षात महाराष्ट्रात 3500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत, मला आठवते की, आज समोरच्या बाकावर सत्ताधारी म्हणून जे सन्माननीय सदस्य बसले आहेत, त्यांच्यापैकी अनेक सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रातील अनेक तालुक्यात व रस्त्यावर (....अडथळा...) मी 289 कसा होते हे सांगत आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण थोडे थांबावे. या विषयावर मला नियम 289 अन्वयेच्या दोन सूचना प्राप्त झाल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे व सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 च्या सूचना दिलेल्या आहेत. आता माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, कापसाला 6500 रुपये प्रती क्विंटल भाव मिळावा म्हणून माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे आपण विरोधी पक्ष नेते असताना मागणी केली होती. आपण व आपल्या सन्माननीय सदस्यांनी याबाबत महाराष्ट्रात आंदोलने केली आहेत. माननीय मंत्री श्री.गिरीष महाजन यांनी देखील आंदोलने केली आहेत. आज त्याच कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल 3800 रुपये भाव मिळत असेल तर (....अडथळा....) माननीय मंत्री श्री.दिलीप कांबळे साहेब तुम्ही पुणे शहरात राहतात, तुम्ही माझ्या सोबत चला, मी तुम्हाला दाखवितो की, कापसाला प्रती क्विंटल 4200 रुपये भाव मिळत नाही, तुम्ही कापूस पिकवत नाहीत.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्ष म्हणून आम्ही यांच्याच प्रथा परंपरेनुसार शेतकऱ्यांच्या हिताचे बॅनर सभागृहात आणले. सत्ताधारी पक्षात एका वर्षापासून बसलेल्या...

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण नियम 289 कसा होतो यावर बोलावे, बॅनर बाबत काय निर्णय घ्यावयाचा आहे तो मी घेईन.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, याचा आपण मथितार्थ समजून घ्यावा. बोर्डवरील शेतकरी हा शब्द देखील सत्ताधारी लोकांना सहन होत नसेल तर आम्ही शेतकऱ्यांच्या बाबतीत या सरकारकडून काय अपेक्षा करावी ? मागील एका वर्षात 3500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आता सत्तेत असलेले सन्माननीय सदस्य विरोधी पक्षात असताना शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तेव्हा आम्ही सत्तेत होतो त्यावेळी आताचे माननीय मुख्यमंत्री म्हणत होते की, त्यावेळी सत्तेत असणाऱ्या प्रत्येकावर कलम 302 चा गुन्हा दाखल करावा. आता 3500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यामुळे कलम 302 चा गुन्हा कोणावर दाखल करावा, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. दुष्काळाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे, तरी देखील दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे. नियम 289 अन्वयेची सूचना दुष्काळावर देण्यात आली आहे.

**सभापती** : विरोधी पक्ष नेत्यांनी मेरिटवर बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

08-12-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-3

VVK/ AKN/ MMP/ 12:00

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी दुष्काळ व शेतकरी या व्यतिरिक्त काहीही बोललो नाही. नियम 289 कसा होतो हे आपण समजून घ्यावे. शेतकऱ्याचा विषय काढला तर या सरकारने पोटात दुखू देऊ नये. आमचा विषय समजून घ्यावा. या सरकारने सुरुवातीला 14000 गावे 50 टक्के आणीवारीच्या आत आहेत असे जाहीर केले. त्यानंतर 3000 गावे 50 टक्के आणीवारीच्या आत आहेत असे जाहीर केले. पहिल्या यादीत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व गावे 50 टक्के आणीवारीच्या वर होती. त्यानंतर पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले ...(अडथळा).... सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आमचे म्हणणे आपण ऐकून तर घ्या. आपल्याबद्दल आम्हाला फार आदर आहे, आपण बोलत असताना आम्ही आपल्या भाषणात कधीही अडथळा आणत नाही.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण माझ्याकडे पाहून बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. पुन्हा सर्वेक्षण केल्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील 1400 गावांची आणेवारी 50 टक्केच्या आत असल्याचे जाहीर करण्यात आले. महाराष्ट्रात 50 टक्के आणेवारीच्या आत असणारी व दुष्काळ पडलेली अनेक गावे आहेत. परंतु प्रशासनाने सरकारच्या दबावाखाली येऊन 50 टक्के आणेवारीच्या वर अनेक गावे दाखविलेली आहेत अशी आमची माहिती आहे. हे सरकार दुष्काळ दाबण्याचा प्रयत्न करीत आहे. सरकार शेतकऱ्यांच्या व्यथा समोर येऊ देत नाही. सरकार शेतकऱ्यांच्या दुष्काळाकडे वेगळ्या नजरेने पाहत आहे. दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते की, दुष्काळाच्या मागणीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला जात नाही. केंद्रीय कृषी मंत्री श्री.राधामोहन सिंह असे सांगतात की, महाराष्ट्र सरकारने दुष्काळाच्या आर्थिक मदतीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला नाही म्हणून आम्ही महाराष्ट्राला मदत देऊ शकत नाही.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, दीर्घ भाषण करु नये.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी थोडक्यात व मेरीटवर बोलत आहे. गेल्या चार वर्षापासून विदर्भ, मराठवाडा व खानदेशात दुष्काळ पडलेला आहे. शेती पिकली नाही म्हणून कर्ज फिटले नाही, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. जे शेतकरी आत्महत्या करीत आहेत ते

...4...



श्री.धनंजय मुंडे....

राजकीय नेत्याला संबोधून चिठ्ठी लिहीत आहेत. यामध्ये सत्ताधारी व विरोधक दोघांचा देखील समावेश होतो. मागील हिवाळी अधिवेशनात सरकारने काही रकमेचे पॅकेज जाहीर केले होते. काही दीर्घकालीन उपाययोजना जाहीर केल्या होत्या.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते नियम 289 कसा होतो यावर आपण बोलावे. सभागृहाचे माननीय नेते बोलणार आहे त्यामुळे आपण थोडे थांबावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी बोलत आहे. आपण विरोधी पक्ष नेत्यांना बोलण्याची संधी दिल्यामुळे ते आपल्या परवानगीने नियम 289 वरील भाषणाच्या वेळी एक तास देखील बोलू शकतात.

सभापती महोदय, केंद्रीय कृषी मंत्री श्री.राधामोहन सिंह यांनी असे वक्तव्य केलेले नाही. त्यावेळी मी स्वत: संसदेच्या गॅलरीमध्ये उपस्थित होतो. याबाबत माननीय श्री.अशोक चव्हाण यांच्याशी देखील मी चर्चा केली होती. असे असेल तर त्यासंदर्भातील प्रोसिडिंग मागविण्यात यावे. ते काय बोलेले हे सभागृहात दाखवावे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये इतकेच मला म्हणावयाचे आहे.

**सभापती** : ठीक आहे, ही बाब तपासून घेण्यात येईल सदर प्रोसिडिंग मागविण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे :सभापती महोदय, मागील हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांनी सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ करण्याची घोषणा सरकारने राणा-भीमदेवी थाटात केली होती.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते नियम 289 कसा होतो इतकेच आपण सांगावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. सरकारने मागील हिवाळी अधिवेशनात पॅकेज जाहीर केले होते तो पैसा आजपर्यंत शेतकऱ्यांना मिळाला नसेल तर या सरकारवर शेतकऱ्यांनी कसा काय विश्वास ठेवावा ? शेतकऱ्यांच्या अतिशय गंभीर प्रसंगामध्ये आम्ही विधानपरिषद नियम 289 अन्वये जी सूचना दिलेली आहे ती आपण स्वीकारावी व त्यासंदर्भातील चर्चा सभागृहात घेण्यात यावी.

.....B-1....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, मागील वेळी सरकारने केलेल्या घोषणा फसव्या ठरल्या आहेत, सरकारने शेतकऱ्यांना काहीही आर्थिक मदत दिलेली नाही. आज या राज्यातील शेतकरी अडचणीत आलेला आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हिवाळी अधिवेशनातील सरकारच्या निर्णयाकडे अपेक्षेने पहात आहे. सरकारला त्यांची अपेक्षा पूर्ण करता येत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, नियम 289 अन्वये जी स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती स्वीकारण्यात यावी.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विरोधी पक्षामार्फत अत्यंत महत्वाच्या विषयावर नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत याची सभागृहाला जाणीव आहे. कर्जबाजारीपणा, नापीकी, शेतीमालाला पुरेसा भाव न मिळणे यामुळे शेतकरी आत्महत्यां करीत आहे. गेल्या वर्षभराच्या काळात राज्यात 3500 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. राज्यातील पोलीस कोठडीत एखाद्या गुन्हेगाराचा मृत्यू झाला तर स्थगन प्रस्तावाची सूचना मान्य करण्यात येऊन त्या विषयावर सभागृहात अल्पकालीन चर्चा केली जाते. राज्यात गेल्या वर्षभराच्या काळात 3500 शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या यापेक्षा आणखी कोणता मोठा नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाचा विषय होऊ शकत नाही. विरोधी पक्षाकडून देण्याची आलेली स्थगन प्रस्तावाची सूचना नाकारण्याचे काम सत्तारुढ पक्षाकडून सुरु आहे. सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे असे केवळ सांगितले जाते. मागील वर्षी सरकारला प्रश्न समजला नाही हे आम्ही समजू शकलो असतो. परंतु आज सरकारकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीची आकडेवारी उपलब्ध आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला काय भाव मिळतो, मागील दोन वर्षात कशाप्रकारे शेतीमालाचे उत्पादन आले याची माहिती शासनाकडे उपलब्ध आहे. त्यामुळे सरकारला या विषयापासून पळवाट काढता येणार नाही. चर्चेची मागणी सरकारने मान्य केली पाहिजे आणि चर्चेनंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर केली पाहिजे.

सभापती महोदय, विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन विदर्भात होत आहे. आम्ही विदर्भातील लोकप्रतिनिधी आहोत. विदर्भातील विदारक दृश्य आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून देत आहोत. या राज्याच्या मंत्रिमंडळातील अनेक मंत्री विदर्भातील आहेत, सत्ताधारी पक्षातील अनेक आमदार विदर्भातील आहेत. भारतीय जनता पक्षाच्या आमदारांना विदर्भातील जनतेने आत्मविश्वासाने निवडून दिले. माननीय पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव देण्याची घोषणा केली होती. असे असतानाही मागील वर्षापेक्षा या वर्षी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दुप्पट झाले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

आहे. विशेषतः पश्चिम विदर्भातील 6 जिल्हयांमध्ये मागील 11 महिन्याच्या काळात 1400 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. यवतमाळ जिल्हयात गेल्या वर्षी 250 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, यावर्षी ही आकडेवारी 400 वर गेली आहे. मागील वर्षी निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतीमधून कोणतेही उत्पन्न आले नाही. सोयाबीनचे पीक पूर्णपणे नष्ट झाले. कापसाची नापीकी झाली. कापसाला योग्य भाव मिळाला नाही, सोयाबीन व धान पिकाला योग्य भाव मिळाला नाही. कापूस पिकविणाऱ्या परिसरात विदारक दृश्य निर्माण झाले आहे. त्यामुळे विदर्भातील शेतकरी सातत्याने कर्जमाफीची मागणी करीत आहे. सावकाराचे कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली, परंतु कोणालाही त्या घोषणेचा लाभ मिळाला नाही. असे नाकर्ते सरकार सत्तेवर बसलेले आहे. विदर्भातील शेतकऱ्यांचे तोंडाला पाने पुसण्याचे काम सुरु आहे. आमची मागणी आहे की, कापूस पिकासाठी एकरी 25 हजार रुपये मदत दिली पाहिजे. धान पिकासाठी एकरी 20 हजार रुपये मदत दिली पाहिजे. सोयाबीन पिकासाठी एकरी 15 हजार रुपये मदत दिली पाहिजे. तसेच सरकारने कर्जमाफीची घोषणा केली पाहिजे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सरकारची चर्चा करण्याची तयारी आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, चर्चा सुरु करावी. विरोधी पक्षाची चर्चेची मागणी सरकार मान्य करीत आहे. चर्चेच्या अनुषंगाने सरकार सभागृहात निर्णय घोषित करण्यास तयार आहे. विरोधी पक्षाला चर्चेमध्ये रस नसून राजकारण करण्यामध्ये रस आहे. विरोधी पक्षाला या विषयाचे राजकारण करायचे आहे. शेतकऱ्यांचा यांना कळवळा नसून शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी यांना काहीही देणे घेणे नाही. विरोधी पक्षाचे सरकार सत्तेत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या. त्यामुळे सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली असा प्रकार सुरु आहे. हे तुमचे पाप आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**सभापती** : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता मी सभागृहाची बैठक 30 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.14 ते 12.44 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

------

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हौद्यात येऊन फलक फडकावून घोषणा देतात.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी आपल्या आसनावर जाऊन बसावे. आज आपल्या सदनातील एका सन्माननीय सदस्यांचा वाढदिवस आहे. त्यांना आपण वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊ या.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हौद्यात येऊन फलक फडकावून घोषणा देतात.)

एक सन्माननीय सदस्य : माझा काल वाढदिवस होता.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हौद्यात येऊन फलक फडकावून घोषणा देतात.)

**उप सभापती :** आज आपल्या सदनातील एका सन्माननीय सदस्यांचा वाढदिवस आहे. त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.47 ते 1.02 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

D-1 .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**
**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)**

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. मला कामकाजाच्या संदर्भात काही निर्णय घ्यावयाचे आहेत. आज सकाळी माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे व सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय मुंडे यांचे नियम 289 अन्वयेचे दोन प्रस्ताव आलेले होते सारासार बुध्दीने विचार केला असता आजच्या दिनक्रमात मला दोन गोष्टी आढळून आलेल्या आहेत. दुष्काळ आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नियम 289 चेही प्रस्ताव आलेले आहेत आणि शासनाच्या बाजुने नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव देखील आलेला आहे. दुसऱ्या बाजूला तांत्रिक दृष्टया न अडवूशकणारे दोन विषय आज माझ्यासमोर आलेले आहेत. त्यातील एक म्हणजे कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे व दुसरे म्हणजे पुरवणी मागण्या सभागृहासमोर ठवेणे.

आज माझ्याकडे आलेले नियम 289 चे दोन्ही प्रस्ताव मान्य करुन त्यांचे रुपांतर नियम 260 व नियम 97 मध्ये करुन सदरहू विषयावर नेमकी कधी चर्चा घ्यावयाची याबाबत नंतर कळविण्यात येईल. उक्त दिवशी दोन्ही विषय चर्चेला घेण्यात येतील. त्यामुळे आता फक्त लेईंग डाऊन करावे असे मला वाटते.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत असतात. )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.:** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 17- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 18- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (तिसरी सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 19- महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 23- महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडिओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 24-महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 20-महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 21-महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 16-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 22-महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**पृ.शी.:**कृषि उत्पन्न पणन(विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XXVIII OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.)

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 28 महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, मागे घेण्यास मी सभागृहाची अनुमती मागतो.

**सभापती :**विधेयक मागे घेण्यास सभागृहाची अनुमती आहे.

श्री.एकनाथराव खडसे :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 28 मागे घेतो.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 28 मागे घेण्यात आले.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**पृ.शी./मु.शी.** : सन 2015-2016 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

श्री.दीपक केसरकर ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015-2016 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2015-2016 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2015-2016 मधील खर्चाचे विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 9 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 12 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 6 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 9 डिसेंबर, 2015 च्या दुपारी 12 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही